MHAU120002812025

| | | |
|---|---|---|
| प्राप्त तारीख | : | २७.०२.२०२५ |
| नोंदणी तारीख | : | २७.०२.२०२५ |
| निकाल तारीख | : | १५.०७.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>०१ ०४ १८ |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **नि.क्र.४५** |
| **सोयगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सोयगांव यांच्या न्यायालयात,**<br>पिठासिन अधिकारी : एम.बी. पाटील, | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.१९५/२०२४ |
| **प्रकरण क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.–५०/२०२५** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत/द्वारा पोलीस स्टेशन अधिकारी,<br>सोयगाव पोलीस स्टेशन.<br>(फिर्यादी – आरती अंकुश सोनवणे) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती आर. एस. हटकर** (सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | १. अंकुश रमेश सोनवणे<br>वय–२४ वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>२. रमेश नामदेव सोनवणे<br>वय–५० वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>३. रेखाबाई रमेश सोनवणे<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>४. सागर रमेश सोनवणे<br>वय–२६ वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>५. निशा सागर सोनवणे<br>वय–२३ वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>क्र.१ ते ५ रा. उप्पलखेडा, ता. सोयगाव,<br>जि. औरंगाबाद.<br>६. मनिषा मिथुन पवार<br>वय–२३ वर्षे, व्यवसाय–मजूरी,<br>रा. कजगाव, ता. भडगाव, जि. जळगाव |

| | |
|---|---|
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. एस. पी. सुर्यवंशी,** (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**बाकी आहे.**

**भाग ब***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३०.०४.२०२१ चे एक आठवडयानंतर |
| पहिल्या खबरीची तारीख | ०९.१०.२०२४ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | १०.०९.२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १५.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १५.०७.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपींबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोष सिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४.<br>५. | अंकुश रमेश सोनवणे<br>रमेश नामदेव सोनवणे<br>रेखाबाई रमेश सोनवणे<br>सागर रमेश सोनवणे<br>निशा सागर सोनवणे | दि.१०.१०.२०२४ आरोपींना सी.आर.पी.सी. ४१–अ ची नोटीस. | दि.१४.१२.२०२५ | भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे. | **निर्दोष** | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | मनिषा मिथुन पवार | | | | | | |

भाग क*

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी

अ. **अभियोग पक्ष** :

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | आरती अंकुश सोनवणे | फिर्यादी **(नि.क्र.२५)** |
| सा.क्र.२ | राजेंद्र बबन भिल/ महाले | साक्षीदार **(नि.क्र.२६)** |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

अ. **अभियोग पक्ष** :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | |

ड. **महत्वाच्या वस्तु** :

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | – |

## न्यायनिर्णय

**(दिनांक – १५ जुलै, २०२६ रोजी घोषित)**

**०१.** आरोपींविरुध्द प्रस्तुतचा खटला दंड विधानाचे कलम ४९८–(अ) ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

**०२.** फिर्यादी आरती हिचे लग्न आरोपी क्र.१ सोबत ३०.०४.२०२१ रोजी रितीरिवाजाप्रमाणे

आरोपी क्र.१ सोबत मौजे उप्पलखेडा येथे झाले. लग्नानंतर फिर्यादी ही उप्पलखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे सासरी नांदण्यासाठी गेली. लग्नानंतर सासरी फिर्यादी ही आरोपी क्र.२ ते ५ यांचेसोबत एकत्र राहत होते. लग्नानंतरच्या एक आठवडयानंतरच आरोपींनी फिर्यादीस त्रास देण्यास सुरुवात केली. आरोपी क्र.१ हा फिर्यादीस "तु घराबाहेर जायचे नाही, घरातच रहायचे, भांडे वगैरे घरातच घासायचे, जर बाहेर गेली तर बघ" अशा धमक्या देऊन चारि–यावर संशय घेत असे. तसेच आरोपी क्र.६ ही माहेरी आली की, आरोपी क्र.१ ला तिच्याबाबत उलटसुलट लावून देत असे. तसेच पती व सासरे हे दारु पिऊन येवून शिवीगाळ करत असत. तसेच आरोपींनी फिर्यादीकडे तिच्या माहेराहून वडीलांकडून मोटरसायकल घेणेसाठी ५०,०००/– घेवुन ये,", अशी मागणी केली व त्याकारणाने तिला शारीरिक व मानसिक त्रास देऊन शिवीगाळ केली. सदर पैसे दिल्यानंतर देखील आरोपींनी पुन्हा घर दुरुस्तीसाठी फिर्यादीकडे ५०,०००/– रुपयांची मागणी केली व त्यावरुन फिर्यादीस मारहाण करुन तिचा मानसिक व शारीरिक छळ केला. सदर पैसे आणले नाही म्हणुन आरोपी क्र.१ ने फिर्यादीस घरातून काढून दिले. त्यानंतर फिर्यादीने महिला तक्रार सिल्लोड येथे सासरचे लोकांविरुध्द तक्रार अर्ज दिला व तरीदेखील आरोपींनी फिर्यादीस नांदवणेसाठी घेऊन गेले नाहीत, त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला जावुन आरोपींविरुध्द तक्रार दिली.

**०३.** उपरोक्त आशयाच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द **गु.र.क्र.१९५/२०२४** भारतीय दंड विधानाचे ४९८–(अ) ३२३, ५०४ सहकलम ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो. ना. आर. एन बर्डे यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–(अ) ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०४.** आरोपी हजर झाल्यानंतर, या न्यायालयाने आरोपींविरुध्द **नि.क्र.१७** नुसार वर नमुद कलमांन्वये गुन्हयाकरीता दोषारोप नोंदवला. दोषारोप आरोपींना समजावुन सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन, संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आलेले नाहीत.

**०६.** खालीलप्रमाणे मुद्दे माझे निष्कर्षासाठी उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, दि.३०.०४.२०२१ च्या एक आठवडयानंतर मौजे उप्पलखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी हिला माहेरहुन "मोटरसायकल घेणेसाठी व घर दुरुस्तीसाठी रुपये ५०,०००/– घेऊन ये" या कारणावरुन तिची शारीरिक तसेच मानसिक छळवणूक केली व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ सहकलम ३४ नुसार अपराध केला? | **...नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीस मारहाण करुन, इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला? | **...नकारार्थी** |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीचा अपमान करुन, तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा, या उद्देशाने प्रक्षोभित केले व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला अपराध केला? | **...नकारार्थी.** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**०७.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी (सा.क्र.१) आरती अंकुश सोनवणे हिची साक्ष (नि.क्र.२५), (सा.क्र.२) राजेंद्र बबन भिल/महाले यांची साक्ष (नि.क्र.२६), वर साक्ष नोंदविली. फिर्यादीस सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही करीता, दिलेली

पुरावा बंद पुरसीस यास (नि.क्र.२९) देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर नि. क्र.२९ च्या अनुषंगाने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ बाबत</u> –**

मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष हे एकमेकांशी निगडीत असल्याने, त्यांची कारणमिमांसा पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीतच नोंदविली आहे.

०८. फिर्यादी आरती (सा.क्र.१) हिचा पुरावा नोंदविण्यात आला. सदर फिर्यादीने तिच्या साक्षीपुराव्यात कथन केले की, आरोपी क्र.१ आरती हा तिचा पती व क्र.२ ते ६ हे सासरचे लोकं आहेत. तिचा विवाह आरोपी क्र.१ सोबत दि.०३.०४.२०२१ रोजी उप्पलखेडा येथे झाला होता, लग्नानंतर ती नांदणेसाठी उप्पलखेडा येथे सासरी गेली. याव्यतिरीक्त फिर्यादीने तिच्या पुराव्यात काहीही कथन केले नाही. सदर फिर्यादी हिने तिच्या साक्षी पुराव्यात अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामूळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे फिर्यादी हिचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, उलटतपास होवून, देखील फिर्यादीच्या पुराव्यातून अभियोग पक्षास सहकार्य होईल, अशी कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात फिर्यादीस फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखवण्यात आला. मात्र, सदर भाग फिर्यादी हिने खरा व बरोबर नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट सदर फिर्यादी हिने तिच्यात व आरोपीमध्ये आपसात तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

०९. अभियोग पक्षातर्फे (सा.क्र.२) राजेंद्र याचा पुरावा नोंदविण्यात आला. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीपुराव्यात कथन केले की, आरोपी क्र.१ हे त्याचे जावई व क्र.२ ते ६ हे त्याच्या मुलीकडील सासरचे लोकं आहेत. तिचा विवाह आरोपी क्र.१ सोबत दि.०३.०४.२०२१ रोजी उप्पलखेडा येथे झाला होता, लग्नानंतर ती नांदणेसाठी उप्पलखेडा येथे सासरी गेली. याव्यतिरीक्त साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात काहीही कथन केले नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य

केलेले नाही. त्यामूळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, उलटतपास होवून, देखील साक्षीदाराच्या पुराव्यातून अभियोग पक्षास सहकार्य होईल, अशी कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदारास साक्षीमधील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखवण्यात आला. मात्र, सदर भाग साक्षीदाराने खरा व बरोबर नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट सदर त्याने त्यांच्यात व आरोपीमध्ये आपसात तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

**१०.** फिर्यादी हिच मुळात फितुर झालेली असल्याने व तसेच फिर्यादीला पुरक अशी साक्ष सा. क्र.२ यांच्या साक्षीतुन अभिलेखावर आलेली नाही. तसेच प्रकरणातील फिर्यादी ही मुख्य साक्षीदार असून, देखील फितुर झालेली असल्याने, घटना खरोखरच घडली होती किंवा कसे याबाबत सांक्षकता निर्माण होते. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण करता, प्राप्त पुराव्यानुसार आरोपींनी गुन्हा केल्याचे शाबीत होत नाही. तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये आपसांत तडजोड झाल्यामुळे आरोपींनी फिर्यादीला मोटरसायकल घेणेसाठी व घर दुरुस्तीसाठी रुपये ५०,०००/– माहेरहुन आणण्यास सांगितले व तिचा मानसिक व शारिरीक छळ केला, तसेच तिला शिवीगाळ करुन तिच्याकडुन सार्वजनिक शांतेतेचा भंग व्हावा किंवा अन्य अपराध घडावा या उद्देशाने प्रक्षोभित केले, हया बाबी शाबीत होवु शकलेल्या नाहीत, म्हणुन मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.–४ करिता –</u>**

**११.** वरील नमुद मुद्दे क्र.–१ ते ३ चे विवेचन, अभियोग पक्षाचा पुरावा व तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये झालेली तडजोड या सर्व बाबींचा विचार करता, आरोपीं हे उपरोक्त नमूद दोषारोपातुन मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी क्र.१ अंकुश रमेश सोनवणे, २. रमेश नामदेव सोनवणे, ३. रेखाबाई रमेश सोनवणे, ४. सागर रमेश सोनवणे, ५. निशा सागर सोनवणे, ६. मनिषा मिथुन पवार यांची भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–(अ), ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दाखल असलेल्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपींचे जातमुचलके व जामीनबंधपत्रं रद्द करण्यात येतात.

०३. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार आरोपींनी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जात मुचलके द्यावे.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.07.15 15:20:46 +0530

**दिनांक –१५.०७.२०२६.**

[एम.बी. पाटील]
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सोयगांव

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per original Judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Y. S. Mali |
| Court | : | J.M.F.C. Court, Soygaon. |
| Date | : | 15.07.2026 |
| Judgment signed by presiding Officer on | : | 15.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 15.07.2026 |